13 JUN 2023 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ...तर भारत विश्वगुरू बनेल

## डॉ. उदय निरगुडकर : शिवाजी विद्यापीठातील परिसंवाद प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भारताला विश्वगुरू बनविण्यासाठी उद्योगक्षेत्र आणि शिक्षण व्यवस्था एकत्र येणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन भारत सरकारच्या नॅशनल हायड्रो इलेक्ट्रिक पॉवर कार्पोरेशनचे स्वतंत्र संचालक डॉ. उदय निरगुडकर यांनी सोमवारी केले. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यापीठ व उद्योग संवाद केंद्रातर्फे युनिव्हर्सिटी-इंडस्ट्री लिंकेजिस : एम्प्लॉयबिलिटी अँड आंत्रप्रिन्युअरशिप डेव्हलपमेंट या विषयावर विशेष परिसंवादाच्या उद्घाटनपर भाषणात ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात हा परिसंवाद झाला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ.दिगंबर शिर्के होते.

यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांनी मार्गदर्शन केले. डॉ.सागर डेळेकर यांनी स्वागत, डॉ. शिवलिंगप्पा सपली यांनी आभार मानले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. महादेव देशमुख, सिद्धार्थ शिंदे, डॉ.श्रीकृष्ण महाजन, डॉ. सरिता ठकार उपस्थित होते.




शिवाजी विद्यापीठाच्या उद्योग संवाद केंद्राच्यावतीने सोमवारी आयोजित विशेष परिसंवादात डॉ. उदय निरगुडकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, प्र. कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते.

> या क्षेत्रामध्ये येणारे विद्यार्थी संवाद कौशल्यामध्ये खूप कमी पडतात. विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढविण्यासाठी विद्यापीठाने मार्गदर्शन करावे. इलेक्ट्रिक वाहनासाठी आवश्यक अभ्यासक्रमाचा अंतर्भाव विद्यापीठाने केला पाहिजे.
>
> -अभय देशपांडे (पायाभूत संरचना उद्योग)

> विद्यार्थ्यांनी मानधनाकडे न पाहता सर्जनशीलतेवर भर द्यावा. वैद्यकीय क्षेत्रामध्ये कास्टिंगचा प्रचंड प्रमाणात वापर होत आहे. विद्यापीठाने अभ्यासक्रम आणि शिक्षणाच्या माध्यमातून सहकार्य केल्यास कोल्हापूर हे वैद्यकीय केंद्र होऊ शकते.
>
> - जयराज पाटील (कास्टिंग)

> उद्योग व्यवसायात येणाऱ्या अडचणींचा अंतर्भाव अभ्यासक्रमामध्ये होणे गरजेचे आहे.
>
> - रमाकांत मालू (समृद्धी इंडस्ट्री)

पुढारी

# भारताला विश्वगुरू बनविण्यासाठी उद्योग, शिक्षण व्यवस्था एकत्र येण्याची गरज

## डॉ. उदय निरगुडकर; विद्यापीठ-उद्योगवृद्धी संवाद कार्यक्रम

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

भारताला विश्वगुरू बनविण्यासाठी उद्योग व शिक्षण व्यवस्था एकत्र येणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन भारत सरकारच्या नॅशनल हायड्रो इलेक्ट्रिक पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेडचे स्वतंत्र संचालक डॉ. उदय निरगुडकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यापीठ व उद्योग संवाद केंद्राच्या वतीने 'युनिव्हर्सिटी-इंडस्ट्री लिंकेजिस : एम्प्लॉएबिलिटी अँड आंत्रप्रिन्युअरशिप डेव्हलपमेंट' विषयावर विद्यापीठ-उद्योग संवादवृद्धीच्या अनुषंगाने आयोजित विशेष परिसंवादाच्या उद्‌घाटनपर भाषणामध्ये ते बोलत होते. डॉ. निरगुडकर म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणामध्ये उद्योग व शैक्षणिक संबंधांवर आधारित संपूर्ण धडा आहे. उद्योग क्षेत्र आणि शिक्षण व्यवस्थेमधील वाढलेली दरी कमी करण्यासाठी विशेष प्रयत्न होणे आवश्यक आहे. उद्योग व्यवसायामध्ये उभारी घेण्यासाठी शिक्षणातील व्यवस्थापनाचा पाया मजबूत असणे आवश्यक आहे. उद्योग क्षेत्रास त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे सुलभ असणारे अभ्यासक्रम विद्यापीठांनी शिकविले पाहिजेत.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांनी नोकरीच्या शोधात न राहता स्वतःचा उद्योग कसा निर्माण करता येईल, हे पाहिले पाहिजे. नावीन्यपूर्ण संशोधनाचा लाभ विद्यार्थी आणि शिक्षकांनी घेतला पाहिजे. अध्यक्षीय मनोगतामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, अद्ययावत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्थानिक समस्यांबरोबरच जागतिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहावे. राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे परिसंवादाची उद्दिष्टे विशद केली. विद्यापीठ व उद्योग संवाद केंद्राचे समन्वयक डॉ. सागर डेळेकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. तंत्रज्ञान अधिविभागप्रमुख डॉ. शिवलिंगप्पा सपली यांनी आभार मानले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. महादेव देशमुख, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सरिता ठकार उपस्थित होते.



कोल्हापूर : विद्यापीठ-उद्योग संवादवृद्धीच्या अनुषंगाने आयोजित विशेष परिसंवादाच्या उद्‌घाटनपर भाषणात बोलताना डॉ. उदय निरगुडकर. शेजारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सागर डेळेकर आदी. (छाया : अर्जुन टाकळकर)

13 JUN 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विद्यापीठ - उद्योग संवादवृद्धी परिसंवादातील सूर; विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांचा सहभाग

# शिक्षणात डिजिटल तंत्रज्ञानाचा समावेश व्हावा

कोल्हापूर, ता. १२ : उच्च शिक्षणात अद्ययावत अभ्यासक्रम, डिजिटल तंत्रज्ञानाचा समावेश व्हावा, असा सूर आज शिवाजी विद्यापीठाच्या विद्यापीठ व उद्योग संवाद केंद्रातर्फे आयोजित विशेष परिसंवादात व्यक्त झाला. या परिसंवादात विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ, मान्यवर सहभागी झाले.



विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात युनिव्हर्सिटी-इंडस्ट्री लिंकेजिस : एम्प्लॉयेबिलिटी अँड आंत्रप्रिन्युअरशीप डेव्हलपमेंट या विषयावर परिसंवाद झाला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी या वर्षापासून सुरू झाली आहे. अद्ययावत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्थानिक समस्यांबरोबरच जागतिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील रहावे. बदलत्या काळामध्ये टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी नवीन तंत्रज्ञानाचे कौशल्य आत्मसात करावेत.'

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी नोकरीच्या शोधात न राहता स्वतःचा उद्योग कसा निर्माण करता येईल हे पहावे.' या परिसंवादाच्या उदघाटनप्रसंगी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. महादेव देशमुख, श्रीकृष्ण महाजन, सरिता ठकार आदी उपस्थित होते. विद्यापीठ व उद्योग संवाद केंद्राचे समन्वयक डॉ. सागर डेळेकर स्वागत केले. तंत्रज्ञान अधिविभागप्रमुख डॉ.शिवलिंगप्पा सपली यांनी आभार मानले.

### तज्ज्ञ म्हणाले ...

- डॉ. उदय निरगुडकर (संचालक, नॅशनल हायड्रो इलेक्ट्रिक पॉवर कार्पोरेशन प्रायव्हेट लिमिटेड): भारत देशाला विश्वगुरू बनविण्यासाठी उद्योगक्षेत्र आणि शिक्षण व्यवस्था एकत्र येणे आवश्यक आहे.
- सिद्धार्थ शिंदे (राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य): विद्यापीठ आणि उद्योग क्षेत्र एकत्र आल्यास दर्जेदार शिक्षणाबरोबरच देशाच्या आर्थिक विकासात निश्चित वृध्दी होईल.
- अभय देशपांडे (पायाभूत संरचना उद्योग): या क्षेत्रामध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य, आत्मविश्वास वाढविण्यासाठी विद्यापीठाने मार्गदर्शन केले पाहिजे. इलेक्ट्रीक वाहनांसाठीच्या अभ्यासक्रमाचा अंतर्भाव व्हावा.
- मोहन जयकर (विधी सेवा): शिक्षकांनी विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांशी इंग्रजीमधून संवाद साधला पाहिजे. अद्यावत अभ्यासक्रमाची माहिती द्यावी.
- जयराज पाटील (कास्टींग): विद्यार्थ्यांनी मानधनाकडे न पाहता सर्जनशीलतेवर भर द्यावा. विद्यापीठाने अभ्यासक्रम आणि शिक्षणाच्या माध्यमातून सहकार्य केल्यास कोल्हापूर वैद्यकीय केंद्र होवू शकते.
- प्रीतम संगवी (प्लास्टिक): विद्यापीठाने या क्षेत्रामधील व्यावहारिक शिक्षणावर भर दिला पाहिजे. विद्यार्थ्यांना, प्रबंध आणि संशोधन प्रकल्प अनिवार्य करावेत.
- सतीश डाकरे (अकौंटंग): कॉमर्स शाखेतील विद्यार्थ्यांनी वाणिज्य संघटन, अर्थशास्त्र, खर्च, सेक्रेट्रीयल प्रॅक्टीस, बिझनेस लॉ, बँकींग अँड इंश्युरन्स, इक्विटी मार्केट, सरकारी लेखे या अभ्यासक्रमांचा विचार करावा. संगणक कौशल्यामध्ये निपुण व्हावे.
- सचिन पाटील (माहिती तंत्रज्ञान): गणितामध्ये आवड असेल, तर विद्यार्थ्यांना आयआयटीमधील कोणत्याही क्षेत्रामध्ये उत्तम करिअर करता येते.
- रमाकांत मालू (समृध्दी इंडस्ट्री लिमिटेड): भांडवलाची उभारणी, टॅक्सेशन, कामगार कायदा, नवीन डिजिटल तंत्रज्ञान आदींचा अंतर्भाव अभ्यासक्रमामध्ये व्हावा.

पुढारी

# विद्यापीठ पदवी अभ्यासक्रम परीक्षेला ६,६४६ विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रम परीक्षेंतर्गत सोमवारी ६ हजार ६४६ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षा २५ मेपासून सुरू आहेत. सोमवारी मास्टर ऑफ सायन्स, मास्टर ऑफ कॉमर्स, मास्टर ऑफ आर्टस्, बॅचलर ऑफ लॉ (पाच वर्ष), बीएस्सी, एमएस्सी (नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी), मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ लॉ, मास्टर ऑफ सोशल वर्क, बॅचलर ऑफ लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन सायन्स, मास्टर ऑफ फाईन आर्टस् आदी २२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयांमध्ये सुरळीतपणे पार पडल्या आहेत.